**Publication:** Punyanagri
**Date:** 05.09.2015
**Page:**03
**Headline:**S.F.S Junior College wins TCS IT Wiz Quiz

# एसएफएस ज्युनियर कॉलेज टीसीएस आयटी क्विझचा विजेता



**नागपूर** : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएस या आघाडीच्या आयटी सेवा कंपनीतर्फे टीसीएस आयटी क्विझचे आयोजन करण्यात आले होते. यात सेमिनरी हिल्स येथील एसएफएस ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. ही शाळा आता मुंबईत होणाऱ्या राष्ट्रीय अंतिम फेरीत नागपूरचे नेतृत्व करणार आहे. टीसीएसद्वारे भारतातील सर्वात मोठी आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात नागपुरातील विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. शुक्रवारी देशपांडे सभागृहात ही स्पर्धा पार पडली. कोणतेही प्रवेश शुल्क नसणारी ही स्पर्धा आठवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी होती. प्रादेशिक फायनल राऊंडमधील ५ फेऱ्यांमधील प्रश्नांची अचूक उत्तरे दिल्यानंतर एसएफएस ज्युनियर कॉलेजचा राहुल भगत आणि उदित परमार या विद्यार्थ्यांनी किताब जिंकला. प्रादेशिक फेऱ्यांमधील प्रत्येक विजेत्याला आयपॅड देण्यात आला. सेंटर पॉइंट स्कूल वर्धमानगर शाळेचे अर्चित वेणुगोपालन आणि संचित खेडकर हे विद्यार्थी रनरअप ठरले.